तात्काळ.

जा. क्र. माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/९२
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक :- ३ /१० /१९९२

प्रति,

सचिव,

.................
रयत शिक्षण संस्था,
.................
सातारा.
.................

विषय :- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नविन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत...

संदर्भ :- मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचे पत्र क्र. एसएसएन-१०९१/३००६/माशि-१ दिनांक १० ऑगस्ट १९९२

शासनाने संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९१ पासून विना अनुदान तत्वावर/कायम विनाअनुदान तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवरच परवानगी देण्यात येत आहे.

[१] संबंधित संस्थांना सन १९९१-९२ या वर्षापासून जरी परवानगी देण्यात येत असली तरी सदरची परवानगी सन १९९२-९३ हे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर देण्यात येत असल्यामुळे या संस्थाद्वारा संचलित संबंधित शाळांना [इंग्रजी माध्यमाची शाळा वगळून] संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांची प्रथम मान्यता मिळाल्यानंतर, सन १९९३-९४ या वर्षात तदर्थ अनुदानासाठी पात्र समजण्यात येईल.

[२] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमा व्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एसएसएन १०८८/१६६९-एन माशि-१ दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

[३] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ. ] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

[४] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

Rayat Shikshan Sanstha
SATARA
INWARD
6 OCT 1992
Sec........ S. No..........

...२/-

[५] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासना-कडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही, अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र [illegible]

[६] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यांत यावेत तसेच प्रवेशा वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्वीकारण्यात येवू नये.

[७] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशनफीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

[८] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यांत आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

[९] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टर प्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत येईल.

[१०] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांचेकडून मंजूर करून घेण्यांत येईल.

[११] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यायावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

[१२] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

[१३] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

[१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढ

....३/-

[३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळा पैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संबंधित संस्थेने कायमस्वरुपी ठेव म्हणून ५०,०००/- [रुपये पन्नास हजार फक्त] चलनाद्वारे शासकीय कोषागारात भरणे आवश्यक आहे. [केवळ इंग्रजी माध्यम शाळांकरिता.]

वरील बाबी पैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ. न. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम. |
|---|---|---|---|---|
| १. | रयत शिक्षण संस्था, सातारा. | असाने, ता. आंबेगाव | आठवी जून १९९१ | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरीता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळांच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची
सही आहे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-

प्रतिलिपी.

१. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.
त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-यांकडून तपासणी करुन आपल्या अभिप्रायासह तपासणी करुन तपासणी अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. मा. उपसचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२.

३. मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांना माहितीसाठी सादर.

सह. सचिव, (माध्य.)
रयत शिक्षण संस्था, सातारा.

मुख्याध्यापक
न्यु इंग्लीश स्कूल असाणे
ता. आंबेगाव, जि. पुणे